

## चल रहे है चरण अगणित
## ध्येय के पथ पर निरंतर

सेवा! शिक्षण! संस्कार!

# प्रज्ञा प्रबोधिनी

Reg. No.: MAH/AMT/127/2003

संपर्क : ११, विवेकानंद छात्रावास,
राजश्री कॉलनी, दस्तूर नगर,
अमरावती - ४४४ ६०६

# पार्श्वभूमी

पिढ्यानपिढ्या मागासलेल्या, अंधश्रद्धेत व समाजाने तिरस्कृत केलेल्या वातावरणात पारधी समाज आपले जीवन जगत आहे, आपल्या समाजात असे अनेक घटक आहेत, परंतु त्यापैकी अनेकांना त्यांनी आपण सुधरावे व समाजाच्या मुख्य धारेत सहभागी व्हावे असे त्यांना वाटल्याने त्या समाज घटकांच्या जीवनात चांगली सुधारणा झाली, परंतु पारधी समाज याला अपवाद ठरला, पारधी समाज मुख्य धारेत कधीच आला नाही किंवा त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कुणीच प्रयत्न केले नाहीत याऊलट त्यांचेवर गुन्हेगारीचा शिक्का लावण्यात आला.

इंग्रजांनी, पोलिसांनी त्यांचेवर अनन्वित असे अत्याचार केले, गावात शहरात राहायला त्यांना जागा दिली नाही त्यामुळे गावकुसा बाहेर राहिले, पोट भरण्यासाठी भीक मागू लागले, शिक्षणात मागे राहिले, समाजाच्या मुख्य प्रवाहात नसल्यामुळे वाईट सवयी, चोरी, शिकार करू लागले, हे करण्याशिवाय त्यांना पर्याय दिसत नव्हता.

जीवनात चांगले परिवर्तन येउ शकते असा विचार त्यांच्या मनात कधीच आला नाही, त्यामुळे ते कायम सर्व सोयी सुविधा संस्कारांपासून वंचित राहिले, ही या समाजाची शोकांतिका आहे. आपण या समाजाकडे दुर्लक्ष केल्यामुळे हा समाज मागासलेलाच राहिला.








# गौरवशाली इतिहास

हा समाज लढवय्या असा आहे, समाजात ऊत्तम कलाकार आहेत, धर्मावर प्रगाढ श्रद्धा असणारा समाज, असणारा सैन्यामध्ये ऊत्तम कामगिरी करणारा व धार्मिक पार्श्वभूमी असा असणार धार्मिक पार्श्वभूमी असलेला हा समाज या समाजाचे मागासलेपण व समाजाचा गौरवशाली इतिहास लक्षात घेउन प्रज्ञा प्रबोधिनी अमरावती या संस्थेने अमरावती जिल्ह्यात या समाजाच्या उत्थानासाठी सेवाकार्य करण्याचे ठरविले.

प्रज्ञा प्रबोधिनी अमरावती या संस्थेची स्थापना दिनांक १४ एप्रिल २००३ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशी करण्यात आली . संस्थेचा सेवाकार्याचा कार्यारंभ सोहळा दिनांक १४ एप्रिल २००३ ला माननीय नितीनजी गडकरी यांचे उपस्थितीत व त्यांचे शुभहस्ते करण्यात आला. अमरावती जिल्ह्यात पारधी समाज ४८ वस्त्यात वेगवेगळ्या तालुक्यात राहतो, संस्थेने चाळीस वस्त्यांचे सर्वेक्षण केले आहे, पस्तीस वस्त्यांत संस्थेचा प्रत्यक्ष संपर्क आहे, वीस वस्त्यांमध्ये पारधी समाजाचे विकासाच्या दृष्टीने वेगवेगळे ऊपक्रम संस्था राबवित आहे.









# वस्त्यांमधील उपक्रम

## पारधी समाजाचा आर्थिक विकास -

स्वयंसहायता बचतगट महिलांचे हिंगलाजपूर व धानोरा फशी येथे बचतगट स्थापण्यात आले आहेत. या बचतगटाला बँकेमार्फत कर्जपुरवठा करण्यात येतो.

## स्व. नानाजी देशमुख कृषी सहायता योजना

शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत शेती करता बी-बियाणे कीटकनाशके याचे विनामूल्य वितरण केले आहे.

## माधव आरोग्यरक्षक योजना

आरोग्याच्या दृष्टीने परमपूजनीय माधव सदाशिव उपाख्य श्री गोलवलकर गुरू जी यांचे स्मृतिप्रीत्यर्थ ही योजना वर्ष २००६ पासून सुरू केली आहे, वस्त्यांमध्ये दवाखान्याची व्यवस्था नसल्याने गैरसोय होते म्हणून विनामूल्य औषधाचे वाटप, आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात येते, आकस्मिक प्रसंगी रु ग्णांवर अमरावती येथे ऊपचार व आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात येते, प्रथमोपचार पेटी चे वितरण, प्रशिक्षित आरोग्य रक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# वस्त्या मध्ये विविध सणांचे आयोजन

गेल्या काही वर्षात दीपावली मिलन, दुर्गोत्सव व संक्रांत मिलन यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन संस्थेने केले आहे मानवी हक्क दिन वैशिष्ट्यपूर्ण असा मानवी हक्क दिन नांदगाव खंडेश्वर येथे वर्ष २०१८-१९ मध्ये संस्थेने संपन्न केला,

**विविध कार्यशाळांचे आयोजन -** संस्थेची व पारधी बंधुंच्या कार्यकर्ता चमूचे प्रशिक्षण व्हावे यादृष्टीने विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत बचत गट, कृषि सहायता योजना, आरोग्य, स्वच्छता, आरोग्यरक्षक योजना व बालसंस्कार केंद्र याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शासकीय योजनांसंबंधी मार्गदर्शन करण्याकरता शासकीय अधिकाऱ्यांना वेळोवेळी निमंत्रित करण्यात आले होते.

**संस्कार शिबिर -** संस्थेतर्फेवेगवेगळ्या वस्त्यांमधील १५० मुला-मुलींचे संस्कार शिबिर वर्ष २०१० मध्ये अमरावती येथे आयोजित करण्यात आले होते. शिबिरात योगासने, खेळ, वेगवेगळ्या स्पर्धा, श्लोक, कथाकथन, मातीची मूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण व महिलांना रांगोळी काढण्याचे प्रशिक्षण अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होत.

**शैक्षणिक उपक्रम -** पारधी बंधूंच्या पाल्यांकरिता २०१३-१४ या वर्षापासून विवेकानंद छात्रावास सुरू केले आहे. सुरुवातीला दहा विद्यार्थी होते व वास्तु संस्थेने भाड्याने घेतली होती. वर्ष २०१८- १९ मध्ये संस्थेने छात्रावासाकरिता नवीन वास्तू खरेदी केली. वास्तू आता अद्यावत सुविधांसह विद्यार्थ्यांना उपलब्ध करू न देण्यात आली आहे. २५ विद्यार्थी वेगवेगळ्या वस्त्यांमधून येथे निवासी आहेत, विद्यार्थ्यांचे प्रवेश वेगवेगळ्या शाळा-महाविद्यालयात करण्यात आलेले आहेत. पर्यवेक्षक, सह पर्यवेक्षक याच समाजातील दाम्पत्य नियुक्त केले आहे. विशेष, शिकवणी वर्गाचे आयोजन येते व संचालन समिती तयार करण्यात आली आहे.

**विवेकानंद छात्रावासातील उपक्रम -** छात्रावासात विद्यार्थ्यांची दरवर्षी वैद्यकीय तपासणी करण्यात येते. रक्षाबंधन, गणेशोत्सव, दीपावलीमिलन हे उत्सव दरवर्षी छात्रावासात संपन्न होतात.

**शैक्षणिक सहल -** शैक्षणिक सहलीचे आयोजन दरवर्षी वेगवेगळ्या पर्यटन स्थळी करण्यात येते.

**कार्यशाळांचे आयोजन -** पर्यावरण पूरक मातीचा गणपती तयार करण्याची कार्यशाळा, मा.शिवराय कुलकर्णी यांचे मार्गदर्शनात घेण्यात आली, या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी ३० गणपती तयार केलेत व ते वसाहतीत पूजेकरता देण्यात आले.

**आकाश कंदील कार्यशाळा -** या कार्यशाळेत कमचीचे आकाशकंदील तयार करण्याकरता प्रशिक्षण देण्यात आले, एकूण ३५ आकाश कंदील विद्यार्थ्यांनी तयार केले.

**अक्षर सुधार प्रकल्प -** अक्षर सुधरावे याकरिता अक्षर सुधार उपक्रम छात्रावासात राबविण्यात येतो.

**वारली पेंटिंग प्रशिक्षण -** वारली पेंटिंग प्रशिक्षण छात्रावासात विद्यार्थ्यांना देण्यात आले.

**स्वच्छता अभियान -** २ ऑक्टोंबर या दिनाचे औचित्य साधून छात्रावास व परिसरात स्वच्छता अभियानाचा उपक्रम राबविण्यात येतो.

**मातृशक्तीचा सहभाग -** मातृशक्तीचे हळदी कुंकवाचा कार्यक्रम मातृशक्तीचा सहभाग प्रकल्पास मिळण्याच्या दृष्टीने मकरसंक्रांतीचे निमित्त साधून महिलांच्या हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन छात्रवासात करण्यात येते.









**खेलकुद** - योग, विविध खेळांच्या स्पर्धा यामध्ये छात्रावासाचे विद्यार्थी सहभागी होतात. छात्रावासाचा विद्यार्थी लव पवार याने नागपूर येथे आयोजित योगा स्पर्धेत सहभाग घेतला व विशेष प्राविण्य मिळविले. विविध गावातील विध्यार्थ्यांचे खेळाचे सामने आयोजित करते.

**यशस्वी वाटचाल** - पारधी वस्त्यांमध्ये विविध उपक्रम सुरू आहेत व त्यामुळे समाजामध्ये विश्वास निर्माण करण्यात संस्थेला यश प्राप्त झाले आहे. छात्रावासात पारधी समाजाचे दांपत्य पर्यवेक्षक व सह पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत व सेवेकरी म्हणूनही काम करीत असल्याने स्वयं प्रेरणा निर्माण झाली.

प्रशांत पवार हा विद्यार्थी छात्रावासातुन पदवीधर होतो आहे, तो आता संस्थेमार्फत वस्त्यांमधील कामाची जबाबदारी घेउन पूर्णकालिक रुपात सेवेकरी म्हणून काम करीत आहे. प्रशांत पवार, सुरज भोसले, पवन पवार यांनी बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली. डिकेश भोसले, अर्जुन भोसले, आदित्य सोळंके, तुषार पवार यांनी दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

**पुरस्कार** - महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संस्थेस शाहू, फुले, आंबेडकर समाजभुषण या सर्वोच्च पुरस्काराने गौरवान्वित केले ही अभिमानास्पद बाब आहे.

**संस्थेची विकास चमू**

| | |
|---|---|
| वस्ती प्रमुख - २० | आरोग्यरक्षक - २० |
| बचत गट चमू - ६ | संस्था कार्यकारिणी - १५ |

## संस्थेचे आगामी वर्षातील राबविण्यात येणारे उपक्रम

**बचत गटाचे विस्तारीकरण** - आगामी वर्षात संस्थेतर्फे तरोडा, दिवानखेडा व मार्डी येथे बचत गट स्थापण्यात येतील.

**सेंद्रिय शेती** - पारधी समाजातील शेतकऱ्यांना शेतीमध्ये चांगले उत्पन्न यावे या दृष्टीने कमी खर्चाच्या शेतीचा व सेंद्रिय शेतीचा प्रयोग एकूण नऊ ठिकाणी संस्था राबविणार आहे, यात ५० शेतकरी सहभागी होतील असा विश्वास आहे.

**बालसंस्कार केंद्र** - वस्त्यांमधील बालकांवर चांगले संस्कार होण्याच्या दृष्टीने काही गावात बालसंस्कार केंद्र सुरू करण्याचा मानस आहे व त्याकरिता शक्षिका नियुक्त करण्यात येणार आहेत.

**आरोग्य स्वच्छता** - संस्थेतर्फे काही गावांमध्ये शुद्ध पेयजल सुविधा पुरविण्याचा मानस आहे.

**कौशल्य विकास कार्यक्रम** - छात्रावासातील व वस्त्यांमधील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्याचा संस्थेचा मानस आहे.

**खेळ गतिविधी** - विवेकानंद छात्रावासातील इमारतीचे छतावर सन्मानीय देणगीदारांच्या मदतीने व्यायाम व मनोरंजनाकरिता सभागृह बांधण्याचा संस्थेचा मानस आहे.

**आरोग्य निदान शिबिरे** - सर्व वस्त्यांमध्ये आरोग्य निदान शिबिराचे आयोजन करण्यात येईल.

**आरोग्य सुविधा** - पारधी वस्त्या तहसिल कायालर्यापासून पासून फार दूर अंतरावर आहेत. त्याठिकाणी शासनाची प्राथमिक स्वास्थ्य केंद्र नाहीत व त्यामुळे ओषधोपचार होत नाही. संस्थेजवळ औषधोपचार व आकस्मिक उपचाराच्या दृष्टीने फिरते वैद्यकीय वाहन असावे असे आम्हाला वाटते.

**आवाहन** - सर्वच उपक्रम व विवेकानंद छात्रावासाचे संचालनाकरीता संस्थेस अर्थसहाय्याची आवशकता असते. सर्वच उपक्रम राबविण्यासाठी दरवर्षी अंदाजे रु. ३ ते ४ लक्ष अर्थसहाय्याची आवश्यकता असते.

**विवेकानंद छात्रावासाचे वार्षिक अंदाजपत्रक -**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-सहपर्यवेक्षक यांचे मानधन वार्षिक | १४४०००/- |
| पूर्णकालिक कार्यकर्ता मानधन | ६००००/- |
| छात्रावास विद्युत पाणी खर्च | ४२०००/- |
| निवासी शिक्षकाचे मानधन | ६००००/- |
| भोजन खर्च | ३६६०००/- |
| औषधोपचार व शालेय शिक्षण खर्च | १५००००/- |
| **एकूण खर्च** | **८२२०००/-** |

आपण देणगी धनादेशाद्वारे वा संस्थेच्या बँक खात्यात थेट जमा करूशकता. देणगी जमा करण्यासाठी संस्थेचा बँक खात्याचा तपशील आपणास देत आहोत.

**BANK OF MAHARASHTRA,** KHAPARDE BAGICHA, AMRAVATI
Saving A/c. : **60079771645**
IFSC : **MAHB0000929**

संस्थेस आयकर खात्या कडून ८० जी ची सवलत प्राप्त आहे, आपण लाभ घेवू शकता. छात्रावासाच्या नित्य संचालनाकरीता संस्थेच्या अन्नपूर्णा योजने अंतर्गत धान्य वा वस्तु स्वरुपात मदत करता येईल. आपण संस्थेला तनमनधन पुर्वक सहकार्य करावे, ही विनंती.

**नरसेवा नारायण सेवा**

अपनी भक्ति अपनी शक्ति, ये करना जन जन का काम।
अपने तप से प्रगटायेंगे, माँ भारत कमलासना
चले निरंतर साधना।

या सेवा कार्यात आपणही सहभागी व्हा,

**आपल्या सदैव प्रतिक्षेत...**

**संस्थेचे कार्यकारी मंडळ**

| | | |
|---|---|---|
| अविनाश देशपांडे | अध्यक्ष | ९७६६९६५४८४ |
| रविंद्र कर्वे | उपाध्यक्ष | ९८५०१८०८८२ |
| मुकुंद पांडे | उपाध्यक्ष | ९५०३००६७४४ |
| सुधीर भारतीय | सचिव | ९८५०३३३२११ |
| अमृता वडवेकर | सहसचिव | ८९९९६९८४८५ |
| मुकुंद देशपांडे | कोषाध्यक्ष | ९४२१८१८८१६ |
| प्रविण जोशी | सदस्य | ९८२२४९१७५९ |

**सदस्य**

डॉ. प्रदिप शिंगोरे
चंद्रकांत दुधाने
प्रविण डाके
मधुसूदन दुचक्के
शुभांगी केसाळे
मिलिंद देशपांडे
सुनिल वेळुकर
हिमांशु वेद

## संस्थेचे कार्य - दृष्यरुप

